प्रेस नोट ता. १६/०५/२०१९

## कोयता गँगच्या म्होरक्यासह त्याच्या एकुण ०७ साथिदारांना अटक

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ४१३/२०१९ भा.द.वि. कलम ३०७ ३४१ १४३ १४७ १४८ १४९ महा. पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ मधील फिर्यादी सौ.रेणुका दिलीप ढिले, वय – ४५ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा. मांजराईनगर, मांजरी बुा, ता.हवेली जि. पुणे या व त्यांचे पती दिलीप शिवाजी ढिले, वय ५४ वर्षे, यांना बिट्या ऊर्फ स्वप्नील कुचेकर, दिपक कुचेकर, संजय कुचेकर, राकेश थोरात, राहुल सावंत, पंकज वाघमारे, तन्मय बडगे, निलेश मधुकर आरते, अक्षय तारु, अंकुश वाडेकर, इम्रान शेख यांनी धारदार शस्त्रे व लाकडी दांडक्यांनी फिर्यादी यांचे पती दिलीप शिवाजी ढिले यांना जिवे मारण्याची धमकी देवुन त्यांना धारदार शस्त्राने व लाकडी दांडक्यांनी डोक्यात व मानेवर वार करुन मारण्याचा मारहाण करुन गंभीर जखमी केले म्हणुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील निष्पन्न आरोपी हे गुन्हा केल्यानंतर फरार झाले होते. हडपसर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी संजय चव्हाण व कर्मचारी यांनी गुन्हयातील फरार आरोपीतांचा ठावठिकाणाबाबत गोपनीय माहिती काढुन येरवडा, ताडीवाला रोड, पुणे स्टेशन, फुरसुंगी, मांजरी या परिसरातुन पकडुन आरोपी नामे बिट्या ऊर्फ स्वप्नील कुचेकर, दिपक कुचेकर, संजय कुचेकर, राकेश थोरात, राहुल सावंत, निलेश मधुकर आरते, अक्षय तारु, अंकुश वाडेकर, यांना २४ तासांच्या आत दाखल गुन्हयात अटक करुन त्यांची पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन स.पो.नि. गाडे हे गुन्हयाचा अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सपोनि किरण लोंढे, सपोनि दिलीप गाडे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना ९३५ इम्रान मुलाणी, पो.शि. ७३१७ नितीन मुंढे, पो.शि. ८६९२ अकबर शेख, पो.शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८६९७ प्रफुल्ल साबळे, पो. शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते, पो. शि. ८३७६ अमित कांबळे यांनी केली आहे.